# रेणुका कॉलेज

## शोधप्रबंधाचा विषय

# बेसा गावातील स्वच्छता व स्वास्थ विषयक सर्वेक्षण

(२०२३—२४)

**(HEALTH AND HYGIENE SURVEY IN BESA VILLAGE)**


**संशोधनकर्ता**

प्रा. हर्षना सोनकुसरे अर्थशास्त्र विभाग

रेणुका महाविद्यालय नागपूर

**मार्गदर्शक**

डॉ. अतुल महाजन

रेणुका महाविद्यालय

# अनुसूची

| अ.क्र. | प्रकरण |
|---|---|
| 01 | प्रस्तावना (Introduction) |
| 02 | विषय निवडीची कारणमिमांसा |
| 03 | संशोधनाचा विषय (Research of Subject ) |
| 04 | सशोधनाची उद्दिष्टये ( Objective of Research ) |
| 05 | संशोधन कार्याचे महत्व ( Importance of Research ) |
| 06 | संशोधनाचे क्षेत्र (Area of Research ) |
| 07 | संशोधन पध्दती (Research Methodology ) |
| 08 | <u>प्रश्नावलीचे विष्लेषण व निवेर्चन</u><br>अ) उत्तरदात्याची सर्वसामान्य माहिती<br>ब) गावातील स्वाच्छता विषयक माहिती<br>क) गावातील स्वास्थ विषयक माहिती |
| 09 | निष्कर्ष (Conclusion ) |
| 10 | सूचना व शिफारशी ( Suggetion ) |
| 11 | संदर्भ ग्रंथ सुची |

# सारणी दर्शक सूची

| अ. क्र. | विभाग अ) उत्तरदात्यांची सर्वसामान्य माहिती दर्षक सारणी |
|---|---|
| ०१ | उत्तरदात्याचे वय दर्शक सारणी |
| ०२ | उत्तरदात्याचे शिक्षण दर्शक सारणी |
| ०३ | उत्तरदात्याचे घराचे स्वरूप दर्शक सारणी |
| ०४ | उत्तरदात्याचे कुटुंबातील एकूण सभासदांची संख्या दर्शक सारणी |
| ०५ | उत्तरदात्याचे बेसा गावात राहण्याची कालावधी दर्शक सारणी |
| ०६ | उत्तरदात्याची नियमित वर्तमानपत्र वाचण्या संबंधी माहिती दर्शक सारणी |
| ०७ | उत्तरदात्याची दुरदर्शन वरील कार्यक्रम बघण्या संबंधी माहिती दर्शक सारणी |
| ०८ | उत्तरदात्याचे गावातील आरोग्यविषयी मतदर्शक सारणी |
| | **विभाग ब) गावातील स्वच्छता विषयक माहिती दर्षक सारणी** |
| ०९ | गावातील स्वच्छतेचे नियोजन संबंधी माहिती दर्शक सारणी |
| १० | गावातील कच–याचे नियोजन संबंधी माहिती दर्शक सारणी |
| ११ | घरातील कचरा टाकण्याचे ठिकाण दर्शक सारणी |
| १२ | घरातील शौचालय संबंधी माहिती दर्शक सारणी |
| १३ | शौचालयाचा वापर नियमित करण्या संबंधी माहिती दर्शक सारणी |
| १४ | गावातील स्वच्छतेच्या समस्या संबंधी माहिती दर्शक सारणी |
| १५ | गाव हागणदारी मूक्त आहे काय? या संबंधी माहिती दर्शक सारणी |
| १६ | गावात सुरू असणा–या आरोग्य विषयक योजना संबंधी माहिती दर्शक सारणी |
| १७ | सरकारकडून असणा–या अपेक्षा संबंधी माहिती दर्शक सारणी |
| | **विभाग क) गावातील स्वास्थ विषयक माहिती दर्षक सारणी** |
| १८ | आजारपणात कोणाचे औषध घेण्यात येते या संबंधी माहिती दर्शक सारणी |
| १९ | घरापासून दवाखाण्याचे अंतर दर्शक सारणी |
| २० | गावात उपलब्ध आरोग्यविषयी सोयी संबंधी माहिती दर्शक सारणी |
| २१ | प्रसुती करीता कोणाची मदत घेण्यात येते त्या संबंधी माहिती दर्शक सारणी |
| २२ | बाळंतपणाचे ठिकाण संबंधी माहिती दर्शक सारणी |
| २३ | लहान मुलांचे लसिकरण संबंधी माहिती दर्शक सारणी |
| २४ | मुलांना निरोगी राखण्यासाठीचे उपाय संबंधी माहिती दर्शक सारणी |
| २५ | कुटुंब नियोजन संबंधी माहिती दर्शक सारणी |
| २६ | कुटुंबातील सदस्यांना असणारे आजार संबंधी माहिती दर्शक सारणी |
| २७ | आंगणवाडीत उपलब्ध आरेग्यविषयक सोयींची संबंधी माहिती दर्शक सारणी |
| २८ | कुटुंबातील अपंग/पोलीयोग्रत व्यक्तीची माहिती दर्शक सारणी आहे काय |
| २९ | गावातील आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी उपाय संबंधी माहिती दर्शक सारणी |

# <u>बेसा गावातील स्वच्छता व स्वास्थ विषयक सर्वेक्षण</u> –२०२३–२४

**<u>प्रस्तावना (Introduction)</u> :**

२०१९ मध्ये महात्मा गांधी यांची १५० वी जयंती आहे. गांधीजींना स्वच्छता प्रिय होती, म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तयार केलेली ''स्वच्छ भारत अभियान'' ची संकल्पना **''महात्मा गांधी स्वच्छ भारत अभियान''** या नावाने सरकार राबवीण्याची तयारी करीत आहे.

''नवीन सरकार लवकरच ''स्वच्छ भारत अभियान'' राबवणार आहे. त्याची सुरवात वाराणसी व उत्तर प्रदेशातल्या काही शहरांतून होईल. 2019 पर्यंत भारतातली एक हजार शहरं व गावं पूर्णपणे स्वच्छ करण्याचं प्रयोजन आहे. या कामासाठी मोठ्या प्रमाणात कचरा निर्मूलन व्यवस्थेचं यांत्रिकीकरण करण्यात येईल. त्यासाठी केंद्र सरकार लागेल तेवढा खर्च करेल.''

जर भारतातली एक हजार शहरं व गावं खरोखरच स्वच्छ झाली. तर रोगराई कमी होईल. बराचसा कचरा ऊर्जा निर्माण करण्यासाठी वापरता येईल व कमी खर्चात ऊर्जा मिळेल. ऊर्जानिर्मितीचं तंत्रज्ञान भाभा अणुसंशोधन केंद्राकडे असल्यामुळे सरकारला ते सहजगत्या मिळेल. देश स्वच्छ दिसायला लागला, तर मोठ्या प्रमाणात परदेशी गुंतवणूक येईल. आर्थिक उत्पन्न व रोजगार वाढेल.

शहर स्वच्छ हा विषय नगरपालिकांच्या अधिकारात असतो. जर केंद्र सरकारनं त्याला प्राधान्य दिल, तर केंद्र राज्य व शहर पातळीवरच्या सरकारी यंत्रणांना एकमेकींशी सहकार्य कसं करायचं, ते शिकता येईल. अशा परिस्थितीत जर केंद्र, राज्य व नगरपालिका या सर्व यंत्रणांमध्ये सहकार्य झालं, तर ते भारतातल्या राजकीय पक्षांमध्ये सकारात्मक संबंधांची घडी बसवण्यासाठी महत्वाचं ठरेल. शिवाय केवळ सरकारी यंत्रणा कोणत्याही शहरात अथवा गावात स्वच्छता राखू शकत नाहीत. त्यासाठी नागरिकांचा सक्रिय पाठिंबा लागतो. जर ''स्वच्छ भारत अभियान'' यशस्वी झाले तर विविध पातळयांवरच्या सरकारी यंत्रणा व समाज यांच्यातलेही संबंध चांगले होतील.

मी या योजनेचं स्वागत करतो. कारण गेल्या काही वर्षा पासून मी या विषयावर बोलत आहे. प्रत्येक शहरात नगराध्याक्षांनी एक सर्वपक्षीय समिती बनवावी. त्या समितीत शहरातले आरोग्य, पर्यावरण, स्वच्छता या विषयातले तज्ज्ञही बोलवावेत. नगरपालिकेच्या दर्जाप्रमाणे आयुक्त अथवा कार्यकारी अधिकारी यांच्याशी संवाद साधावा व आपल्या शहरात संपूर्ण स्वच्छता निर्माण करण्यासाठी एक आराखडा तयार करावा. त्यासाठी नगरपालिका किती खर्च करील, याचा अंदाज घ्यावा. हे सर्व अल्प वेळात करणं शक्य आहे. समिती बनविण्यासाठी एक आठवडा, सरकारी अधिकाऱ्यांबरोबर तपशीलवार चर्चा पूर्ण करण्यासाठी एक महिना व आराखडा बनवण्यासाठी तीन महिने असं वेळापत्र बनवावं. ते करून एक प्रस्ताव तयार करावा. त्याचा एकपानी कार्यकारी सारांश काढावा व तो प्रस्ताव

पहिल्या पानावर ''कार्यकारी सारांश'' असं लिहून पंतप्रधानांच्या कार्यालयाकडं पाठवावा. त्याची एक प्रत स्थानिक खासदाराला देऊन पंतप्रधान कार्यालयात पाठपुरावा करण्याचं काम खासदाराला द्यावं.

जर एखाद्या शहरात महापौर हे करायना तयार नसतील, तर माननीय नागरिकांच्या गटाने पुढाकार घ्यावा अथवा एखाद्या सेवाभावी संस्थेने आणि शैक्षणिक संस्थेने सुद्धा पुढाकार घ्यावा आणि स्थानिक वर्तमानपत्रांच्या मदतीनं महापौरांचे व इतर नेत्यांचे मन या विषयात रस घेण्यासाठी वळवावं.

जोपर्यंत नागरिक एखाद्या उपक्रमात स्वतःहून हिरिरीने पुढं येत नाहीत. तोपर्यंत केवळ सरकारकडून आमूलाग्र परिवर्तन होण्याची अपेक्षा ठेवणं चुकीचं असेल. खरं तर शाळा–शाळात हयाची सुरवात करता येईल. आपल घर आणि आवार स्वच्छ ठेवणे हा नियम प्रत्येकाने पाळला तरच हे शक्य आहे. आपल्याकडे जो नियम तोडतो त्याला शिक्षा होत नाही. पण परिणाम मात्र नियम पाळणाऱ्याला भोगावे लागतात कठोर अंमलबजावणी आवश्यक आहे.

''महात्मा गांधीच्या १५० व्या जन्म शताब्दीनिमित्त स्वच्छ भारत हीच त्यांना योग्य आदरांजली ठरेल'' असे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदींनी राजपथ, नवी दिल्ली येथे ०२ ऑक्टोबर २०१४ रोजी स्वच्छ भारत अभियानाची सुरूवात करताना म्हटले. स्वच्छ भारत अभियानाला देशव्यापी एका चळवळीचे स्वरूप देण्यात आले. स्वच्छेतेच्या या चळवळीचे नेतृत्व करताना जनतेने महात्मा गांधीचे स्वच्छ व निरोगी भारताचे स्वप्न पूर्ण करावे. असे जनतेला आवाहन केले. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदींनी स्वतःहाती झाडू घेऊन दिल्लीतील मंदीर मार्ग पोलीस ठाण्याचा परिसर स्वच्छ केला. रस्त्यावर लोकांनी घाण करू नये व इतरांनाही त्यापासून परावृत्त करावे, असे आवाहन त्यांनी केले. जनतेला पंतप्रधानांनी ''ना गंदगी करेंगे, ना करने देंगे'' चा मंत्र दिला. याप्रसंगी पंतप्रधानांनी नऊ व्यक्तींना स्वच्छता मोहिमेचे दूत म्हणून घोषीत केले तसेच या व्यक्तींना अणखी नऊ व्यक्तीना स्वच्छतेचे दूत बनवण्यास सांगितले

जनतेच्या सहभागामुळे स्वच्छ भारत अभियानाचे रूपांतर एका राष्ट्रय चळवळीत झाले. या अभियानामुळे लोकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण झाली आहे. लोकांच्या सक्रीय सहभागामुळे महात्मा गांधींचे स्वप्न लवकरच आकार घेण्याच्या मार्गावर आहे.

पंतप्रधानांनी स्वतःच्या उक्ती व कृतीतून जनतेला स्वच्छ भारत अभियानाचा संदेश दिला आहे. पंतप्रधानांनी वाराणसीमध्येही स्वच्छता मोहीम राबवली. स्वच्छ भारत अभियानांतर्गत त्यांनी गंगा नदीच्या अस्सी घाटावर अभियानाची सुरूवात केली. स्थानिक लोक मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. याप्रसंगी पंतप्रधानांनी स्वच्छतेची माहीती विशद करत देशातील अनेक कुटुंबामध्ये शौचालये नसल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांविषयी प्रबोधन केले. पथनाट्याच्या माध्यमातून देशभरात स्वच्छतेविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

स्वच्छ भारत अभियानात लोकांचा सहभाग, विविध विभाग, संघटनांनी राबवलेले उपक्रम याबद्दल पंतप्रधानांनी प्रशंसोउद्गार काढले. पंप्रधान श्री नरेंद्र मोदी समाज माध्यमातून (सोशल मिडियाच्या) लोक सहभागाबद्दल नेहमीच प्रशंसा करत आले आहेत. स्वच्छ भारत अभियानाचा भाग म्हणून 'My Clean India' हा उपक्रम समाज माध्यमांवर (सोशल मिडियावर) सुरू करण्यात आला.

लोकांच्या प्रतिसादामुळे स्वच्छ भारत अभियानला जनचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. लोकांनी उत्स्फूर्त सक्रीय सहभाग नोंदवत स्वच्छ व निटनेटक्या भारताची शपथ घेतली.

रस्ते साफ करणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे, शौचालयांची स्वच्छता व निरोगी वातावरण यासाठी हाती झाडू घेणे हा स्वच्छ भारत अभियानाचा भागच बनला आहे. लोकांनी ही चळवळ पुढे नेत ''ईश्वराचे दुसरे रूप म्हणजे स्वच्छता'' हया संदेशाच्या प्रसारात मदत केली आहे.

## विषय निवडीची कारणमिमांसा :–

घरांची, गावांची, परिसरांची व पर्यायाने देशाचीही स्वच्छता न्हावी व सर्वसामान्य जनतेचे आरोग्य मानव पर्यार्याने जीवनमान उंचवावे व त्यायोूगे ''स्वच्छतेतून समृद्धीकडे'' हे संकल्पना मूर्तरूपात येणे अपेक्षित आहे. तसेच पर्यावरणाचे संवर्धन, जतन व संरक्षण करून समृद्धी व संपन्न परिसर, गाव व पर्याया देशाची निर्मिती करणेही काळाची गरज असल्याने जल, जमीन, जंगल, हवा, वनस्पती इ. चे योग्य व्यवस्थापन करून भौतिक सोयी – सुविधांची निर्मिती ''पर्यावरण संतुलन'' ठेऊन केल्यास नागरिकांचे जीवनमान, दर्जा सुधारण्यास मदत होईल. त्यासाठी स्वच्छतेची सवय प्रत्येकांमध्ये खोलवर रूजण्याची नितांत आवश्यकता आहे. याच विचार प्रभावाने प्रेरीत होवून संशोधकाने हा विषय हाताशी घेतला आहे. आणि आपला महाविद्यालय ज्या गावात येतो त्या परीसरात स्वच्छ भारत अभियान चा प्रभाव तपासण्याचा प्रयत्न संशोधक आणि विद्यार्थांनी केला आहे.

आधुनिक युग हे संशोधनाचे व क्षेत्रीय अभ्यासाचे युग आहे. मानवी विकास हा आर्थिक विकासावर व भौगोलीक घटकावर अवलंबून राहतो. त्यासाठी मानवी जीवन व नैसर्गीक पर्यावरणाच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे आवश्यक झाले आहे. एखादया क्षेत्राला प्रत्यक्ष भेट देवून निरीक्षण व मुलाखतीतून होणा–या भौगोलीक पाहणीच्या माध्यमातून नैसर्गिक, सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक घटकांच्या अभ्यासाला क्षेत्रीय अभ्यास म्हणतात.

**नागपूर शहराची पार्श्वभूमी :–** नागपूर हे महाराष्ट्र राज्याचे उपराजधानीचे शहर आहे. व राज्यातील तीसरे मोठे शहर आहे. नागपूर हे भारतातील तेरावे मोठे नागरी क्षेत्र ( Urban conglomeration) आहे. नागपूर महाराष्ट्राचा विदर्भ भागातील सर्वात मोठे शहर, नागपूर जिल्हा व राज्याचा नागपूर विभागाचे प्रशासकीय मुख्यालय आहे महाराष्ट्र विधानसभेचे हिवाळी अधिवेशन नागपूरात घेतले जाते.

भौगोलीकदृष्टया देशाच्या मध्यभागात असलेल्या या शहरातच भारताचा शुन्य मैलाचा दगड आहे. नागपूरास 'संत्रानगरी' असेही संबोधतात कारण शहरातील संत्री प्रसिध्द आहे.

. **नागपूर शहराचा इतिहास :–** नागपूरचा सर्वप्रथम उल्लेख १० व्या शतकातील ताम्रपटावर आढळतो. हा ताम्रपट देवळी (वर्धा) येथे मिळाला असून तो इ.स. ९४० चा आहे. छिंदवाडा जिल्हयातील देवगड चा गोंड राजा बक्त बुलंद शहा याने १७०२ साली नागनदीच्या तिरावर नागपूर शहराची स्थापना केली. देवगड राज्यात त्याकाळी नागपूर, शिवनी, बालाघाट, बैतुल आणि होशंगाबाद यांचा समावेश होत असे. बक्त बुलंद शहा नंतर त्याचा मुलगा राजा चांद सुलतान देवगडच्या गादीवर आला. त्याने १७०६ साली त्याची राजधानी नागपूरास हलवली त्याने जवळ जवळ ३३ वर्ष राज्य करून नागपूर शहर भरभराटीस आणले. राजा चांद सुलतान याच्या मृत्युनंतर नागपूरवर भोसल्यांचे राज्य आले इ.स. १७४२ मधे रघुजी राजे भोसले नागपूरच्या गादीवर आरूढ झाले. इ.स. १८१७ मध्ये सीताबर्डीच्या लढाईमध्ये मराठयांचा पराभव करून ब्रिटीशांनी नागपूरचा ताबा घेतला. सवतंत्रपूर्व काळात कांग्रेसची दोन अधिवेशने नागपूरात झाली. व असहकार आंदोलन नागपूरच्या १९२० च्या अधिवेशनात सुरू झाले १९५० साली मध्यप्रदेश राज्याची निर्मिती झाली. व नागपूरला या राज्याची राजधानी होण्याचा मान मिळाला. कालांतराने मे १ इ.स. १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आली व व–हाड (विदर्भ) नव्या राज्यात आला. आज नागपूर महाराष्ट्र राज्याची उपराजधानी असून महाराष्ट्र विधानसभेचे हिवाळी अधिवेशन येथे भरते.

**नागपूरचे लोकजीवन व संस्कृती :–** मराठी हे नागपूरातील सर्वात जास्त बोलली जाणारी भाषा आहे. मराठीची वरहाडी बोली भाषा विदर्भतील इतर भागाप्रमाणे येथे देखिल बोलली जाते हिंदी भाषा व इंग्रजी या शहरातील इतर भाषा आहेत. इ.स. 2001 च्या जनगनणेनुसार नागरी लोकसंख्या 2,129,500 इतकी होती.

**नागपूरची अर्थव्यवस्था :–** नागपूर हे विदर्भातील महत्वाचे व्यवसायीक केंद्र आहे. अलीकडील काही वर्षात नागपूरात गुंतवणूक वाढत असून येथिल अर्थव्यवस्था विस्तारत आहे. इ.स. 2004 साली नागूरात रू. 5000 कोटी इतकी गुंतवणूक झाली आहे. नागपुरातील आंतराष्ट्रीय विमानतळाजवळ माल सामान व प्रवासी केंद्रची (मल्टिमॉडल इंटरनॅशनल हब एरपोर्ट ऍट नागपूर–MIHAN) निर्मित होत आहे. हा प्रकल्प आग्नेय व मध्य–पूर्व आशियातील सामान– वाहतुकीकरीता महत्वाचा थांबा (Break of bulk) बनणार आहे. विमान बनविणा–या जगप्रसिध्द बोइंग कंपनीने नागपूरात 18.5 कोटी डॉलर भांडवलाचा प्रकल्प सुरू करण्याचा प्रस्ताव दिला आहे. क्षेत्रफळानुसार बुटिबोरी आशियातील सर्वात मोठी औद्योगिक वसाहत आहे.

विषय ( **Subject** ) :– बेसा गावातील स्वच्छता व स्वास्थ विषयक सर्वेक्षण :२०२३–२४




गट ग्रामपंचायत बेसा– बेलतरोडी










## <u>संशोधनाची उद्दिष्टये ( Objective of Research )</u> :–

### विशयाच्या अनुशंगाने उद्दिष्ट्ये

- बेसा गावातील स्वच्छेते विषयक सर्वसामान्य माहिती गोळा करणे
- बेसा गावातील लोकांची आरोग्य विषयक माहिती गोळा करणे
- बेसा गावातीचा स्वच्छ भारत अभियान मोहिमेतील सहभाग विषयक माहिती गोळा करणे
- मिळालेल्या तथ्यांचे विश्लेषण व वर्गीकरण करणे
- केंद्र व राज्य शासनाव्दारे ग्रामिण विकासासाठी असलेल्या योजनांचे अवलोकन करणे.
- मिळविलेल्या माहितीवरून निष्कर्ष काढणे
- स्वच्छ भारत अभियान मोहिम यशस्वी होण्याकरीता उपाय सूचविणे

### विद्यार्थ्यांच्या अनुषंगाने उद्दिष्ट्ये

- विद्यार्थ्यांना संशोधनाची ओळख व आवळ निर्माण करणे
- विद्यार्थ्यांना संशोधनातील तथ्य संकलन प्रक्रियेत सहभागी करणे
- विद्यार्थ्यांना संशोधनातील माहितीच्या आधारावर निष्कर्ष काढण्याच्या तंत्राची माहिती देणे.

**<u>संशोधन कार्याचे महत्व ( Importence of Research )</u> :–** 21 वे शतक हे परीवर्तनाचे शतक मानल्या जाते. त्याच प्रमाणे परीवर्तन हे चराचर सृष्टीचे नियम आहे. परंतू या परीवर्तनामुळे अनेक अनअपेक्षीत समस्या निर्माण होतात. त्या समस्यांना कोणत्या प्रकारे सोडवावे व समायोजन करावे याचा प्रयास करने सुध्दा अनिवार्य असते

बेसा गावातील लोकजिवनात मिहानच्या प्रोजेक्टमध्ये अनेकविध परीवर्तन वा बदल होत आहे. या बदलामुळे गावातील मुळ संस्कृती मागे पळत जात आहे व त्यामध्ये शहरीकरण, नागरीकरण, संस्कृतिकरणाचा प्रभाव पडत आहे गावातील भारावलेली तरूण पीढी वाट्टेल त्या मार्गाचा व वाम मार्गाचा अनुकरण करत आहे स्विकार करीत आहे. शेती विकूण प्लाट, फ्लॅट सिस्टम सुरू झाले आहे. या अनुशंगाने येणा–या पुढच्या पिढीला मोठया समस्येला तोंड दयावे लागणार आहे. महणूनच या संशोधनातून पुढच्या पिढीकरीता काही मार्ग दाखविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. काही शासकीय व गैरशासकीय योजनांची अंमलबजावणी या क्षेत्रात झाली तर स्थानिक युवकांना गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देता येईल हेच या संशोधन कार्याचे महत्व आहे.

## संशोधनाचे क्षेत्र ( Area of Research ) :–

नागपूर शहराच्या दक्षिण दिशेला बेसा गाव आहे. या गावात गट ग्रामपंचायत आहे. जे बेलतरोडी, पिपळा आणि बेसा तीन्ही गावाचे नियंत्रण करते. बेसा गावातील एकूण लोकसंख्या 15,00 असून गावातील घरांची एकूण संख्या 809 आहे. गावातील स्त्री–पुरूषाचे प्रमाण जवळ जवळ सम प्रमाणात आहे. व गावात प्रमुख सार्वजनिक संस्था (स्थानिक स्वराज्य संस्थेसहीत) महिला बचत गट, शिवनकला, बालवाडी, आंगणवाडी, शिक्षाधाम व सेवाधाम वृध्दाश्रम आहे. गावात एक प्रार्थमिक शाळा आहे. व गावातील मुख्य रस्ता नागपूर शहराच्या प्रमुख रस्त्याला जोडलेला आहे. बेसा हे गाव मिहान मुळे प्रभावित झाले आहे.

**संशोधन पध्दती (Research Methodology )** :– संशोधन हि बौध्दिक प्रक्रीया आहे. याव्दारे नविन ज्ञान प्रकाशात आणले जाते, रॉबर्ट लिंडने यांनी Practical and applied research पध्दतीचा पुरस्कार केला. या पध्दती नुसार समस्याचा शोध घेणे समस्यांना प्रतिबंधित करणे व त्यावर उपाय सुचविणे यावर भर असतो.

**वर्णनात्मक संषोधन आराखडा (Descrptive Reserch Design)** :– प्रस्तुत शोधप्रबंध प्रामुख्याने वर्णनात्मक संशोधन आराखडा यावर आधारीत आहे. एखादया समस्येशी संबंधीत असलेल्या वास्तविक तथ्यांच्या आधारावर वर्णनात्मक विवेचन करणे हा वर्णनात्मक शोध आराखडयाचा मुख्य उददेश आहे. या करीता प्राथमिक व दुत्तीय संकलन पध्दतीचा उपयोग करण्यात आला असुन त्यानुसार बेसा गावातील सामाजिक व आर्थिक माहिती मिळमवण्याचा प्रयत्न केला आहे.

**तथ्य संकलन (Data collection)** :–प्रस्तुत शोधकार्यात वर्णनात्मक आराखडयातील वैज्ञानिक तंत्राचा वापर करून तथ्य संकलीत केले आहे. या आराखडयात प्रामुख्याने मुलाखती, अनुसूची व प्रश्नावली, प्रत्यक्ष निरीक्षण, सहभागी निरीक्षण, याचे विश्लेषण हया सर्व प्रकाराचा समावेश करून शोधप्रबंधाचे कार्य केले आहे.


**नमुना निवड (Sampling)** :– बेसा येथील स्वच्छता व स्वास्थय विषयक माहिती गोळा करण्यासाठी त्या गावातील प्रतिनिधी सदस्य निवडून त्यांच्याकडून तथ्य गोळा केले आहे. व प्रतिनीधिकडून मिळविलेली माहिती संपुर्ण समुहाची किंवा समग्राची आहे. असे मानले जाते. काही ठिकाणी प्रत्यक्ष मुलाखती पध्दतीचा वापर करून माहिती गोळा केली आहे.

# प्रष्नावलीचे विष्लेषण व वर्गीकरण

## विभाग अ) उत्तरदात्याची सर्वसामान्य माहिती

सारणी क्र – 1
उत्तरदात्याचे वय दर्शक सारणी

| प्रतिसाद/पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| 20 ते 30 वर्ष | 23 | 23% |
| 30 ते 40 वर्ष | 49 | 49% |
| 40 ते 50 वर्ष | 28 | 28% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे वय दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 49% उत्तरदाते 30 ते 40 वर्षाचे आहे आणि प्रतिसाद देणारे 28% उत्तरदाते, 40 ते 50 वर्ष असून 20 ते 30 वर्ष प्रतिसाद देणारे 23% उत्तरदाते आहेत.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त उत्तरदाते 30 ते 40 वर्षाचे आहेत.

सारणी क्र – 2

उत्तरदात्याचे शिक्षण दर्शक सारणी

| **प्रतिसाद / पर्याय** | **संख्या** | **प्रतिसाद** |
|---|---|---|
| दहावीच्या कमी | 11 | 11% |
| दहावी | 43 | 43% |
| बारावी | 34 | 34% |
| स्नातकच्या वर | 12 | 12% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे शिक्षण दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 43% उत्तरदाते दहावी आहेत आणि बारावी पर्यत शिक्षण घेणारे 34% उत्तरदाते, स्नातकच्या वर 12% उत्तरदाते आहेत. दहावीच्या कमी प्रतिसाद देणारे 11% उत्तरदाते आहेत.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 38% उत्तरदाते क्रमशः दहावी, बारावी, स्नातकच्या वर, दहावीच्या कमी आहेत.

सारणी क्र — 3
उत्तरदात्याचे घराचे स्वरूप दर्शक सारणी

| **प्रतिसाद/पर्याय** | **संख्या** | **प्रतिसाद** |
|---|---|---|
| मातीचे | 07 | 07% |
| कुळाचे | 00 | 00% |
| कच्चे घर | 35 | 35% |
| पक्के घर | 37 | 37% |
| फ्लॅट | 21 | 21% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे घराचे स्वरूप दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 37% उत्तरदात्यांचे पक्के घर आहेत आणि 35% उत्तरदात्यांचे कच्चे घर आहेत, 21% उत्तरदात्यांचे फ्लॅट आहेत व 7% उत्तरदात्यांचे मातीचे घर आहेत कुळाचे घर हे 00% आहेत म्हणजेच बेसा मध्ये कुळाचे घर नाहीत असे म्हणता येईल.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 41% उत्तरदात्यांचे पक्के घर आहेत.

**सारणी क्र – 4**
**उत्तरदात्याच्या कुटुंबातील एकूण सभासदांची संख्या दर्शक सारणी**

| प्रतिसाद / पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| मुले | 37 | 42% |
| मुली | 28 | 26% |
| इतर सदस्य. | 35 | 32% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे उत्तरदात्याच्या कुटुंबातील एकूण सभासदांची संख्या दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 37% उत्तरदाते त्यांच्या घरी मुलं आहेत आणि 35 % उत्तरदाते त्यांच्या घरी इतर सदस्य आहेत, 28% उत्तरदाती त्यांच्या घरी मुली आहेत.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 37% उत्तरदाते त्यांच्या घरी क्रमशः मुलं, इतर सदस्य, मुली आहेत.

**सारणी क्र – 5**

**उत्तरदात्याचे बेसा गावातील निवासाची कालावधी दर्शक सारणी**

| **प्रतिसाद/पर्याय** | **संख्या** | **प्रतिसाद** |
|---|---|---|
| 00 ते 10 वर्ष | 21 | 21% |
| 10 ते 20 वर्ष | 41 | 41% |
| 20 ते 30 वर्ष | 28 | 28% |
| 30 वर्षा पेक्षा जास्त | 10 | 10% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे बेसा गावातील निवासाची कालावधी दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 41% उत्तरदाते बेसा मध्ये 10 ते 20 वर्षा पासून राहत आहेत आणि 28% उत्तरदाते बेसा मध्ये 20 ते 30 वर्षा पासून राहत आहेत आणि 21% उत्तरदाते बेसा मध्ये 00 ते 10 वर्षा पासून राहत आहेत आणि 10 % उत्तरदाते बेसा मध्ये 30 वर्षा पेक्षा जास्त दिवसांपासून राहत आहेत

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 38% उत्तरदाते बेसा मध्ये 10 ते 20 वर्षा पासून राहत आहेत.

**सारणी क्र – 6**

**उत्तरदात्याचे नियमित वर्तमानपत्र वाचण्या संबंधी माहिती दर्शक सारणी**

| **प्रतिसाद / पर्याय** | **संख्या** | **प्रतिसाद** |
|---|---|---|
| होय | 53 | 53% |
| नाही | 27 | 27% |
| प्रतिसाद नाही. | 20 | 20% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे नियमित वर्तमानपत्र वाचण्या संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 53% उत्तरदाते बेसा मध्ये नियमित वर्तमानपत्र वाचतात आणि 27% उत्तरदाते बेसा मध्ये नियमित वर्तमानपत्र वाचत नाही आणि 20% उत्तरदाते बेसा मध्ये नियमित वर्तमानपत्र वाचतात यासंबंधी प्रतिसाद दिला नाही.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 48% उत्तरदाते बेसा मध्ये नियमित वर्तमानपत्र वाचतात.

## सारणी क्र – 7
## उत्तरदात्याचे दुरदर्शन वरील कार्यक्रम बघण्या संबंधी माहिती दर्शक सारणी

| प्रतिसाद / पर्याय | संख्या | प्रतिसाद |
| --- | --- | --- |
| नियमित | 55 | 55% |
| अनियमित | 22 | 22% |
| कधी–कधी | 23 | 23% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे दुरदर्शन वरील कार्यक्रम बघण्या संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 55% उत्तरदाते बेसा मध्ये दुरदर्शन वरील कार्यक्रम नियमित बघतात आणि 22 % उत्तरदाते बेसा मध्ये दुरदर्शन वरील कार्यक्रम अनियमित स्वरूपाने बघतात आणि 23% उत्तरदाते बेसा उत्तरदाते बेसा मध्ये दुरदर्शन वरील कार्यक्रम कधी–कधी बघतात.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 52% उत्तरदाते बेसा मध्ये दुरदर्शन वरील कार्यक्रम नियमितस्वरूपे बघतात.

**सारणी क्र – 8**

**उत्तरदात्याचे गावातील आरोग्यविषयी मतदर्शक सारणी**

| **प्रतिसाद / पर्याय** | **संख्या** | **प्रतिसाद** |
|---|---|---|
| शांततामय | 23 | 23% |
| तणावग्रस्त | 22 | 22% |
| धार्मिक | 38 | 38% |
| एकोप्याचे | 17 | 17% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे गावातील आरोग्यविषयी मतदर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 38% उत्तरदाते बेसा मध्ये धार्मिक मताचे आहेत आणि 22 % उत्तरदाते बेसा मध्ये तणावग्रस्त आहेत आणि 23 % उत्तरदाते बेसा मध्ये शांततामय वातावरणात आहेत आणि 17 % उत्तरदाते बेसा मध्ये एकोप्याचे जीवन जगत आहेत.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 38% उत्तरदाते बेसा मध्ये धार्मिक मताचे आहेत.

# विभाग ब) गावातील स्वच्छता विषयक माहिती

**सारणी क्र – 9**
**उत्तरदात्याचे गावातील स्वच्छतेचे नियोजन बददल मतदर्शक सारणी**

| प्रतिसाद/पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| होय | 42 | 42% |
| नाही | 40 | 40% |
| माहित नाही | 28 | 28% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे गावातील स्वच्छतेचे नियोजन बददल मतदर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 42% उत्तरदाते बेसा मध्ये स्वच्छतेचे नियोजन करतात आणि 40% उत्तरदाते बेसा मध्ये स्वच्छतेचे नियोजन करत नाही आणि 28% उत्तरदाते बेसा मध्ये स्वच्छतेचे नियोजन बद्दल माहीत असे प्रतिसाद देणारे आहे.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 42% उत्तरदाते बेसा मध्ये स्वच्छतेचे नियोजन करतात.

**सारणी क्र – 10**

**उत्तरदात्याचे गावातील कचऱ्याचे नियोजन संबंधी माहिती दर्शक सारणी**

| **प्रतिसाद / पर्याय** | **संख्या** | **प्रतिसाद** |
|---|---|---|
| ग्रामपंचायतचे कचरा वाहक | 66 | 66% |
| खाजगी | 26 | 26% |
| माहित नाही | 08 | 08% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे गावातील कचऱ्याचे नियोजन संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 66% उत्तरदाते बेसा मध्ये कचऱ्याचे नियोजन करतात म्हणजेच ग्रामपंचायतचे कचरा वाहनाचा उपयोग कचऱ्याचे नियोजनासाठी करतात आणि 26% उत्तरदाते बेसा मध्ये खाजगी **पर्यायाचा** उपयोग कचऱ्याचे नियोजनासाठी करतात आणि 8 % उत्तरदात्यांना कचऱ्याचे नियोजन बद्दल माहीती नाही.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 66% उत्तरदाते बेसा मध्ये कचऱ्याचे नियोजन करतात.

**सारणी क्र – 11**
**उत्तरदात्याचे गावात घरातील कचरा टाकण्याचे ठिकाण दर्शक सारणी**

| प्रतिसाद/पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| सार्वजनिक कचरा स्थळ | 73 | 73% |
| घराच्या बाजुला | 20 | 20% |
| कुठेही | 07 | 07% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे गावात घरातील कचरा टाकण्याचे ठिकाण दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 73% उत्तरदाते बेसा मध्ये सार्वजनिक कचरा स्थळाचे उपयोग करतात आणि 20 % उत्तरदाते कुठेही कचरा टाकतात, 7 % उत्तरदाते बेसा मध्ये घराच्या बाजुला कचरा टाकतात.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 73% उत्तरदाते बेसा मध्ये सार्वजनिक कचरा स्थळाचे उपयोग करतात.

## सारणी क्र – 12
## उत्तरदात्याचे घरातील शौचालय संबंधी माहिती दर्शक सारणी

| प्रतिसाद/पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| होय | 91 | 91% |
| नाही | 08 | 08% |
| माहित नाही | 00 | 00% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे घरातील शौचालय संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 91% उत्तरदाते बेसा मध्ये घरातील शौचालयाचा उपयोग करतात आणि 8 % उत्तरदाते बेसा मध्ये घरातील शौचालयाचा उपयोग करत नाही , 00 % उत्तरदाते उत्तरदाते बेसा मध्ये घरातील शौचालय संबंधी माहिती नाही आहे असे म्हणतात म्हणजे सर्वांना बेसा मध्ये घरातील शौचालय संबंधी माहिती आहे.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 91% उत्तरदाते बेसा मध्ये घरातील शौचालयाचा उपयोग करतात.

## सारणी क्र – 13
## उत्तरदात्याचे घरातील शौचालयाचा वापर नियमित करण्या संबंधी माहिती दर्शक सारणी

| **प्रतिसाद / पर्याय** | **संख्या** | **प्रतिसाद** |
|---|---|---|
| होय | 90 | 90% |
| नाही | 10 | 10% |
| माहित नाही | 00 | 00% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे घरातील शौचालयाचा वापर नियमित करण्या संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 88% उत्तरदाते बेसा मध्ये घरातील शौचालयाचा उपयोग करतात आणि 12 % उत्तरदाते बेसा मध्ये घरातील शौचालयाचा उपयोग करत नाही , 00 % उत्तरदाते उत्तरदाते बेसा मध्ये घरातील शौचालय संबंधी माहिती नाही आहे असे म्हणतात म्हणजे सर्वांना बेसा मध्ये घरातील शौचालय संबंधी माहिती आहे.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 48% उत्तरदाते बेसा मध्ये घरातील शौचालयाचा उपयोग करतात.

## सारणी क्र – 14
## उत्तरदात्याच्या गावातील स्वच्छतेच्या समस्या संबंधी माहिती दर्शक सारणी

| प्रतिसाद/पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| वाहतुकीची समस्या | 15 | 15% |
| पाण्याची समस्या | 54 | 54% |
| ग्राम स्वच्छतेची समस्या | 10 | 10% |
| आरोग्य समस्या | 21 | 21% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याच्या गावातील स्वच्छतेच्या समस्या संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 54% उत्तरदाते बेसा मध्ये पाण्याची समस्या असे म्हणतात आणि 15% उत्तरदाते बेसा वाहतुकीची समस्या असे म्हणतात आणि 21 % उत्तरदाते बेसा आरोग्य समस्या असे म्हणतात आणि 10% उत्तरदाते बेसा ग्राम स्वच्छतेची समस्या असे म्हणतात .

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 54% उत्तरदाते बेसा मध्ये पाण्याची समस्या व नंतर क्रमवारी वाहतुकीची समस्या, आरोग्य समस्या, ग्राम स्वच्छतेची समस्या असे म्हणता येईल.

## सारणी क्र – 15
## उत्तरदात्याचा गाव हागणदारी मूक्त आहे काय? या संबंधी माहिती दर्शक सारणी

| प्रतिसाद/पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| होय | 91 | 91% |
| नाही | 6 | 06% |
| माहित नाही | 3 | 03% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचा गाव हागणदारी मूक्त आहे काय? या संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 91% उत्तरदात्यांनी होय असा प्रतिसाद दिला आणि 6% उत्तरदात्यांनी नाही असा प्रतिसाद दिला आणि असे 3% उत्तरदात्यांनी माहीत नाही असा प्रतिसाद दिला आहे .

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 91% उत्तरदात्यांनी गाव हागणदारी मूक्त आहे असा प्रतिसाद दिला.

**सारणी क्र – 16**

**उत्तरदात्याचा गावात सुरू असणा–या आरोग्य विषयक योजना संबंधी माहिती दर्शक सारणी**

| **प्रतिसाद / पर्याय** | **संख्या** | **प्रतिसाद** |
|---|---|---|
| लसीकरण | 35 | 35% |
| पल्स पोलीयो | 35 | 35% |
| टिकाकरण | 30 | 30% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचा गावात सुरू असणा–या आरोग्य विषयक योजना संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 35% उत्तरदात्यांनी लसीकरण योजना होय असा प्रतिसाद दिला आणि 35% उत्तरदात्यांनी पल्स पोलीयो योजना होय असा प्रतिसाद दिला आणि असे 30% उत्तरदात्यांनी टिकाकरण बद्दल माहीत आहे असा प्रतिसाद दिला आहे.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 35% उत्तरदात्यांनी लसीकरण योजना आणि पल्स पोलीयो योजना होय असा प्रतिसाद दिला

## सारणी क्र – 17
## उत्तरदात्याचा सरकारकडून असणा–या इतर अपेक्षा संबंधी माहिती दर्शक सारणी

| प्रतिसाद/पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| ग्रामीण सडक योजना | 34 | 34% |
| घरकुल योजना | 26 | 26% |
| वृध्दापकाळ योजना | 10 | 10% |
| ग्राम विकास योजना | 12 | 12% |
| कृषी संवर्धन योजना | 18 | 18% |
| **एकूण** | **100** | **100%** |




वरील उत्तरदात्याचा सरकारकडून असणा–या इतर अपेक्षा संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 34% उत्तरदात्यांनी ग्रामीण सडक योजना बद्दल होय असा प्रतिसाद दिला आणि 26% उत्तरदात्यांनी घरकुल योजना बद्दल होय असा प्रतिसाद दिला, 18% उत्तरदात्यांनी ग्राम विकास योजना आणि कृषी संवर्धन योजना बद्दल होय असा प्रतिसाद दिला आणि असे 10% उत्तरदात्यांनी वृध्दापकाळ योजना बद्दल होय असा प्रतिसाद दिला.


वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 34% उत्तरदात्यांनी ग्रामीण सडक योजना बद्दल होय असा प्रतिसाद दिला.

# विभाग क) गावातील स्वास्थ विषयक माहिती

**सारणी क्र – 18**

**आजारपणात कोणाचे औषध घेण्यात येते या संबंधी माहिती दर्शक सारणी**

| प्रतिसाद/पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| घरघुती | 34 | 34% |
| मांत्रिक | 10 | 10% |
| डॉक्टर | 51 | 51% |
| जडीबुटी | 5 | 05% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील आजारपणात कोणाचे औषध घेण्यात येते या संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 51% उत्तरदात्यांनी आजारपणात डॉक्टर जवळ जातात असा प्रतिसाद दिला आणि 34 % उत्तरदात्यांनी आजारपणात घरघुती उपाय करतात व 10 % उत्तरदात्यांनी आजारपणात मांत्रिक कडे जातात आणि असे व 5 % उत्तरदात्यांनी आजारपणात जडीबुटीचा उपायोग करतात असा प्रतिसाद दिला आहे .

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 51% उत्तरदात्यांनी आजारपणात डॉक्टर जवळ जातात असा प्रतिसाद दिला आहे.

## सारणी क्र – 19
## उत्तरदात्याचे घरापासून दवाखाण्याचे अंतर दर्शक सारणी

| प्रतिसाद/पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| 0 ते 5 कि.मी. | 73 | 73% |
| 5 ते 10 कि.मी. | 21 | 21% |
| 10 ते 15 कि.मी. | 4 | 4% |
| 15 कि.मी. ते जास्त | 2 | 2% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे घरापासून दवाखाण्याचे अंतर दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 73% उत्तरदात्यांचे 0 ते 5 कि.मी. दवाखाण्याचे अंतर आहे व 21% उत्तरदात्यांनी 5 ते 10 कि.मी. दवाखाण्याचे अंतर आहे व 4% उत्तरदात्यांनी 10 ते 15 कि.मी. दवाखाण्याचे अंतर आहे आणि 2% उत्तरदात्यांनी 15 कि.मी. पेक्षा जास्त दवाखाण्याचे अंतर आहे असा प्रतिसाद दिला आहे .

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 73% उत्तरदात्यांनी 0 ते 5 कि.मी. दवाखाण्याचे अंतर आहे असा प्रतिसाद दिला आहे.

**सारणी क्र – 20**

**उत्तरदात्याचे गावात उपलब्ध आरोग्यविषयी सोयी संबंधी माहिती दर्शक सारणी**

| **प्रतिसाद / पर्याय** | **संख्या** | **प्रतिसाद** |
|---|---|---|
| ग्रामीण रूग्णालय | 11 | 11% |
| खाजगी डॉक्टर | 89 | 89% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे गावात उपलब्ध आरोग्यविषयी सोयी संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 89% उत्तरदात्यांनी गावात उपलब्ध असलेले खाजगी डॉक्टर कडे आरोग्यविषयी समस्या साठी जातात आणि 11% उत्तरदात्यांनी गावात उपलब्ध असलेले ग्रामीण रूग्णालयाकडे आरोग्यविषयी समस्या साठी जातात असा प्रतिसाद दिला आहे .

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 89% उत्तरदात्यांनी गावात उपलब्ध असलेले खाजगी डॉक्टर कडे आरोग्यविषयी सोयी साठी जातात असा प्रतिसाद दिला आहे.

**सारणी क्र – 21**

**उत्तरदात्याचे गावात प्रसुती करीता कोणाची मदत घेण्यात येते त्या संबंधी माहिती दर्शक सारणी**

| प्रतिसाद/पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| दाई ( प्रशिक्षीत दाई ) | 6 | 6% |
| डॉक्टर (खाजगी ) | 94 | 94% |
| वैद्य | 0 | 00% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे गावात उपलब्ध आरोग्यविषयी सोयी संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 94% उत्तरदात्यांनी गावात उपलब्ध असलेले खाजगी डॉक्टरांची गावात प्रसुती करीता मदत घेतात आणि 6% उत्तरदात्यांनी गावात उपलब्ध असलेले दाई (प्रशिक्षीत दाई) गावात प्रसुती करीता मदत घेतात आणि 00% उत्तरदात्यांनी गावात उपलब्ध असलेले वैद्य गावात प्रसुती करीता मदत घेतात म्हणजे गावात प्रसुती करीता वैद्याची मदत कोणीही घेत नाही असा प्रतिसाद दिला आहे .

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 94% उत्तरदात्यांनी गावात उपलब्ध असलेले खाजगी डॉक्टरांची गावात प्रसुती करीता मदत घेतात असा प्रतिसाद दिला आहे.

**सारणी क्र – 22**

**उत्तरदात्याचे गावात प्रसुती बाळंतपणाचे ठिकाण संबंधी माहिती दर्शक सारणी**

| प्रतिसाद / पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| घर | 9 | 9% |
| दवाखाना | 91 | 91% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे गावात प्रसुती बाळंतपणाचे ठिकाण संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 91% उत्तरदात्यांनी प्रसुती बाळंतपणासाठी दवाखान्यात जातात आणि 9% उत्तरदात्यांनी प्रसुती बाळंतपण घरी करतात असा प्रतिसाद दिला आहे .

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 81% उत्तरदात्यांनी प्रसुती बाळंतपणासाठी दवाखान्यात जातात असा प्रतिसाद दिला आहे.

## सारणी क्र – 23
## उत्तरदात्याचे गावात लहान मुलांचे लसिकरण संबंधी माहिती दर्शक सारणी

| प्रतिसाद/पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| लसीकरण नियीमत होते | 73 | 73% |
| लसीकरण मिळत नाही | 11 | 11% |
| लसीकरणाची माहीती नाही | 16 | 16% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे गावात लहान मुलांचे लसिकरण संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 73% उत्तरदात्यांनी लसीकरण नियीमत होते आणि 11% उत्तरदात्यांनी लसीकरण मिळत नाही असे सांगीतले आणि 16% उत्तरदात्यांनी लसीकरणाची माहीती नाही असा प्रतिसाद दिला आहे .

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 73% उत्तरदात्यांनी लसीकरण नियीमत होते असा प्रतिसाद दिला आहे.

## सारणी क्र – 24

## उत्तरदात्याचे गावात मुलांना निरोगी राखण्यासाठीचे उपाय संबंधी माहिती दर्शक सारणी

| प्रतिसाद/पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| लसीकरण | 89 | 89% |
| जडीबुटीचा उपयोग | 7 | 7% |
| देवाला नवस करणे | 4 | 4% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे गावात मुलांना निरोगी राखण्यासाठीचे उपाय संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 89% गावात मुलांना निरोगी राखण्यासाठीचे उपायसाठी लसीकरणाचा उपयोग करतात आणि 7% गावात मुलांना निरोगी राखण्यासाठीचे उपायसाठी जडीबुटीचा उपयोग करतात आणि 4% गावात मुलांना निरोगी राखण्यासाठीचे उपायसाठी देवाला नवस करतात असा प्रतिसाद दिला आहे .

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 89% गावात मुलांना निरोगी राखण्यासाठीचे उपायसाठी लसीकरणाचा उपयोग करतात असा प्रतिसाद दिला आहे.

## सारणी क्र – 25
## उत्तरदात्याचे गावात कुटुंब नियोजन संबंधी माहिती दर्शक सारणी

| प्रतिसाद / पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| होय | 75 | 75% |
| नाही | 13 | 13% |
| प्रतिसाद नाही. | 12 | 12% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे गावात कुटुंब नियोजन संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 75% गावात कुटुंब नियोजनाचा उपयोग करतात आणि 13% उत्तरदात्याचे गावात कुटुंब नियोजनाचा उपयोग करत नाही आणि 12% उत्तरदात्याने गावात कुटुंब नियोजन बद्दल प्रतिसाद दिला नाही.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 81% गावात कुटुंब नियोजनाचा उपयोग करतात असा प्रतिसाद दिला आहे

## सारणी क्र – 26
## उत्तरदात्याचे गावात कुटुंबातील सदस्यांना असणारे आजार संबंधी माहिती दर्शक सारणी

| प्रतिसाद / पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| होय | 75 | 75% |
| नाही | 21 | 21% |
| प्रतिसाद नाही. | 04 | 04% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे गावात कुटुंबातील सदस्यांना असणारे आजार संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 21% गावात कुटुंबातील सदस्यांना असणारे आजार संबंधी माहिती आहे असे सांगीतले आणि 75% गावात कुटुंबातील सदस्यांना असणारे आजार संबंधी माहिती नाही असे सांगीतले 4% उत्तरदात्याचे कुटुंबातील सदस्यांना असणारे आजार संबंधी बद्दल प्रतिसाद दिला नाही.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 75% गावात कुटुंबातील सदस्यांना असणारे आजार संबंधी माहिती आहे असा प्रतिसाद दिला आहे.

## सारणी क्र – 27
## उत्तरदात्याचे गावात आंगणवाडीत उपलब्ध आरोग्यविषयक सोयींची संबंधी माहिती दर्शक सारणी

| प्रतिसाद / पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| होय | 64 | 64% |
| नाही | 17 | 17% |
| प्रतिसाद नाही. | 19 | 19% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याचे गावात आंगणवाडीत उपलब्ध आरोग्यविषयक सोयींची संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 64% आंगणवाडीत उपलब्ध आरोग्यविषयक सोयींची संबंधी माहिती आहे असे सांगीतले आणि 17% आंगणवाडीत उपलब्ध आरोग्यविषयक सोयींची संबंधी माहिती बद्दल प्रतिसाद दिला नाही आणि 19% आंगणवाडीत उपलब्ध आरोग्यविषयक सोयींची संबंधी माहिती नाही असे सांगीतले.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 64% आंगणवाडीत उपलब्ध आरोग्यविषयक सोयींची संबंधी माहिती आहे असे सांगीतले आहे असा प्रतिसाद दिला आहे.

**सारणी क्र – 28**

**उत्तरदात्याच्या कुटुंबातील अपंग / पोलीयोग्रस्त व्यक्तीची माहिती दर्शक सारणी आहे काय**

| प्रतिसाद / पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| होय | 14 | 14% |
| नाही | 81 | 81% |
| प्रतिसाद नाही. | 5 | 05% |
| **एकूण** | **100** | **100%** |





वरील उत्तरदात्याच्या कुटुंबातील अपंग/पोलीयोग्रस्त व्यक्तीची माहिती दर्शक सारणी आहे सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 81% कुटुंबातील अपंग/पोलीयोग्रस्त व्यक्तीची सारणी बद्दल माहिती नाही असे सांगीतले आणि 14% कुटुंबातील अपंग/पोलीयोग्रस्त व्यक्तीची सारणी बद्दल माहिती आहे असे सांगीतले 14% कुटुंबातील अपंग/पोलीयोग्रस्त व्यक्तीची माहिती सारणी बद्दल प्रतिसाद दिला नाही.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 81% कुटुंबातील अपंग/ पोलीयोग्रस्त व्यक्तीची माहिती नाही असा प्रतिसाद दिला आहे.

**सारणी क्र – 29**

**गावातील आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी उपाय संबंधी माहिती दर्शक सारणी**

| प्रतिसाद / पर्याय | संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|
| दवाखाण्याची सोय असावी | 68 | 68% |
| पीण्याच्या पाणीची सोय असावी | 25 | 25% |
| प्रतिसाद नाही. | 07 | 7% |
| **एकूण** | **100** | **100%** |




वरील गावातील आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी उपाय संबंधी माहिती दर्शक सारणीवरून असे दिसून येते की एकूण उत्तरदात्यांपैकी 68% उत्तरदात्यांनी दवाखाण्याची सोय असावी अशा प्रतिसाद दिला 25% उत्तरदात्यांनी पीण्याच्या पाणीची सोय असावी सोय असावी असा प्रतिसाद दिला आणि 7% उत्तरदात्यांनी प्रतिसाद दिला नाही.

वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त 68% उत्तरदात्यांनी प्रथम दवाखाण्याची सोय असावी व दुसरे पीण्याच्या पाणीची सोय असावी असा प्रतिसाद दिला आहे.

## निष्कर्ष ( Conclusion ) :–

- वरील सारणीच्या प्रतिसादावरून असे निष्कर्ष काढता येते की जास्तीत जास्त उत्तरदाते 30 ते 40 वर्षाचे आहेत.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 43% उत्तरदाते क्रमशः दहावी, बारावी, स्नातकच्या वर, दहावीच्या कमी आहेत.

- बेसा गावातील जास्तीत जास्त 37% उत्तरदात्यांचे पक्के घर आहेत.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 42% उत्तरदाते त्यांच्या घरी क्रमशः मुलं, इतर सदस्य, मुली आहेत.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 38% उत्तरदाते बेसा मध्ये 10 ते 20 वर्षा पासून राहत आहेत.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 53% उत्तरदाते बेसा मध्ये नियमित वर्तमानपत्र वाचतात.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 55% उत्तरदाते बेसा मध्ये दुरदर्शन वरील कार्यक्रम नियमितस्वरूपे बघतात.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 38% उत्तरदाते बेसा मध्ये धार्मिक मताचे आहेत.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 37% उत्तरदाते बेसा मध्ये स्वच्छतेचे नियोजन करतात.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 57% उत्तरदाते बेसा मध्ये कचऱ्याचे नियोजन करतात.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 48% उत्तरदाते बेसा मध्ये सार्वजनिक कचरा स्थळाचे उपयोग करतात.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 48% उत्तरदाते बेसा मध्ये घरातील शौचालयाचा उपयोग करतात.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 48% उत्तरदाते बेसा मध्ये घरातील शौचालयाचा उपयोग करतात.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 60% उत्तरदाते बेसा मध्ये पाण्याची समस्या व नंतर क्रमवारी वाहतुकीची समस्या, आरोग्य समस्या, ग्राम स्वच्छतेची समस्या असे म्हणता येईल.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 75% उत्तरदात्यांनी गाव हागणदारी मूक्त आहे असा प्रतिसाद दिला.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 35% उत्तरदात्यांनी लसीकरण योजना आणि पल्स पोलीयो योजना होय असा प्रतिसाद दिला.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 34% उत्तरदात्यांनी ग्रामीण सडक योजना बद्दल होय असा प्रतिसाद दिला.

- बेसा गावातील जास्तीत जास्त 51% उत्तरदात्यांनी आजारपणात डॉक्टर जवळ जातात असा प्रतिसाद दिला आहे.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 73% उत्तरदात्यांनी 0 ते 5 कि.मी. दवाखाण्याचे अंतर आहे असा प्रतिसाद दिला आहे.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 91% उत्तरदात्यांनी गावात उपलब्ध असलेले खाजगी डॉक्टर कडे आरोग्यविषयी सोयी साठी जातात असा प्रतिसाद दिला आहे.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 89% उत्तरदात्यांनी गावात उपलब्ध असलेले खाजगी डॉक्टरांची गावात प्रसुती करीता मदत घेतात असा प्रतिसाद दिला आहे.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 94% उत्तरदात्यांनी प्रसुती बाळंतपणासाठी दवाखान्यात जातात असा प्रतिसाद दिला आहे.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 73% उत्तरदात्यांनी लसीकरण नियीमत होते असा प्रतिसाद दिला आहे
- बेसा गावातील जास्तीत जास्त 89% गावात मुलांना निरोगी राखण्यासाठीचे उपायसाठी लसीकरणाचा उपयोग करतात असा प्रतिसाद दिला आहे.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 75% गावात कुटुंब नियोजनाचा उपयोग करतात असा प्रतिसाद दिला आहे.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 75% गावात कुटुंबातील सदस्यांना असणारे आजार संबंधी माहिती आहे असा प्रतिसाद दिला आहे.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 64% आंगणवाडीत उपलब्ध आरोग्यविषयक सोयींची संबंधी माहिती आहे असे सांगीतले आहे असा प्रतिसाद दिला आहे.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 81% कुटुंबातील अपंग/पोलीयोग्रस्त व्यक्तीची माहिती नाही असे सांगीतले असा प्रतिसाद दिला आहे.
- बेसा गावातील जास्तीत जास्त 79% उत्तरदात्यांनी प्रथम दवाखाण्याची सोय असावी व दुसरे पीण्याच्या पाणीची सोय असावी असा प्रतिसाद दिला आहे.

## उपाययोजना ( Suggetion ) :–

1) **ग्रामस्वच्छता :–** गावातील लोकात स्वच्छते विषयी जागृतता करण्याची गरज आहे. ग्रामस्वच्छतेसाठी ठिकठिकाणी सांडपाण्याची सोय करने व कच–यासाठी खडडे तयार करण्यात यावे. व बेसा गावामध्ये प्रथम योग्य स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय जनतेला उपलब्ध करून देणे.

Cleanliness is next to Godliness – म. गांधी या घोष वाक्यास अनुसरून मा. पंतप्रधान यांनी नेमके आपल्या मर्मावर बोट ठेवून स्वच्छता अभियानाची सुरवात केली आहे. आपले सर्वांचेच हे कर्तव्य ठरते की, आपण केवळ वैयक्तिक स्वच्छतेवरच भर न देता सामुदायिक पातळीवर एकत्र येवून काम केल्यास आपले शारीरिक स्वास्थ्य व सामाजिक स्वास्थ टिकण्यास व वृद्धींगत होण्यास मदत होईल. त्यामुळे आपण केवळ वैयक्तिक स्वार्थ साधत नाहीतर, ती एक मोठी देश सेवा व निसर्ग सेवाही आहे.

पहिले पाऊल घरचा धंदा। दुसरे पाऊल दाराच्या प्रबंधा।।
पुढे ग्राम सफाईच्या छंदालावोनि घ्यावे आनंदे।।

**सार्वजनिक स्वच्छते मध्ये येणाऱ्या गोष्टी :–**

1. **पाणी व्यवस्थापन :–** ग्रा.पा.पु., स्वच्छता समिती व ग्राम सभेमार्फत जल अंदाज पत्रक व त्याची अंमलबजावणी, टि.सी.एल. पावडर / हायपोचा नियमित वापर, शुद्ध व स्वच्छ पाणी पुरवठा, पाणी गळती थांबविणे.
2. **सांडपाणी व्यवस्थापन :–** शोषखड्डे, बंदिस्तगटारे, परसबाग, शेतीउदयोग इ. द्वारे शास्त्र शुद्ध विल्हेवाट व पूर्नवापर करणे.
3. **शौचालय/मुतारीव्यवस्थापन :–** विविध उत्सवातील विसर्जन करून पर्यावरण दृष्टया अंमलबजावणी करणे, सार्वजनिक ठिकाणी पुरेशी शौचालये व मुतारींची व्यवस्था व वापर तसेच, हात धुण्यासाठीची व्यवस्था व पुरेसे पाणी (उदा. शाळा, कॉलेजेस, बससस्थानके, भाजीमार्केटवगैरे) शौचालयांमधील मैल्याची विल्हेवाट करून बायोगेंस, सोन खतनिर्मितीही करता येवू शकते.
4. **घन कचरा व्यवस्थापन :–** कचरापेटयांची पुरेशी संख्या, ओला, सुका व प्लास्टिक कचऱ्यांचे वेळोवेळी वर्गीकरण व विल्हेवाट, कचरा उचलून नेण्याची सातत्यापूर्ण व स्वतंत्र व्यवस्था, ओल्या कचऱ्याचे नेंडेप/गांडूळखत/कंपोस्टखत इ. मार्गाने खतात रूपांतर व पूनर्वापर तसेच दवाखाने, रूग्णालये येथील घातक ठरणाऱ्या कचऱ्याची शास्त्र शुद्ध पद्धतीने विल्हेवाट लावून आर्थिक उत्पन्नही मिळविता येवू शकते.

5. **अपारंपारिक ऊर्जेचा वापर :—** स्ट्रेट लाईट, सोलर यांचा वैयक्तिकव सार्वजनिक वापर करणे, प्लास्टिकबंदी (50 मायक्रोंन) ची अंमलबजावणी करणे.
6. **पर्यावरण सवंर्धनः—** वृक्षलागवड, जतन, संवर्धन, टेगिंग करणे व वृक्ष लागवडीची नोंद ठेवणे
7. **घर/गांव/परिसरस्वच्छता :—** गावातीलरस्ते, गल्ल्या, घरासमोरील अंगणे, परसबाग, स्वच्छता, सजावट व वृक्ष संवर्धन तसेच, अन्न धान्य साठवणुक पिण्याच्या पाण्याची व वापराची शास्त्र शुद्ध व्यवस्था, स्वच्छता नीटनेटकेपणा इत्यादी.

## संदर्भ ग्रंथ सूची


| अ.क्र. | लेखकाचे नाव | पुस्तकाचे नाव | प्रकाशन |
|---|---|---|---|
| १. | आगलावे प्रदीप, | ‘संशोधन पद्धतिशास्त्र व तंत्र’, | श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००८ |
| २. | आपटे डी. पी., | ‘सामाजिक आर्थीक पाहणीचे तंत्र’ | समाजप्रबोधन संस्था, पुणे २००० |
| ३. | आहूजा राम, | ‘भारतीय सामाजिक व्यवस्था’ | रावत पब्लिकेशन, जवाहर नगर, जयपूर १९९२ |
| ४. | कविमंडल डॉ. विजय, | ‘विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन’ | मंगेश प्रकाशन, नागपूर १९९९. |
| ५. | गोस्वामी कुणाल, | ‘भारतीय महिला विविध आयाम’ | दरयागंज, नई दिल्ली—१२१२. |
| ६. | आगलावे प्रदीप, | ‘भारतीय समाज प्रष्न आणि मुद्‌दे’ | साई प्रकाषन नागपूर. |
| ७. | आगलावे प्रदीप, | ‘मूलभूत समाजषास्त्रीय सिध्दांत’ | साई प्रकाषन नागपूर. |
| ८. | रा.ज. लोटे | भारतीय समाज आणि सामाजिक समस्या. | |
| ९. | डॉ. पुखराज जैन | भारतीय षासन एवं राजनिती. | |
| १०. | डलतवद ूमपदमत | Politics of scarcity, (1968) | |
| ११. | चौधरी, कि.का., | महाराश्ट्र राज्य गॅझेरिअर (नागपूर जिल्हा) पृ. १,८७. | |
| १२. | सहस्त्रबुद्धे, षिरीश, | बखर कॉंग्रेसची पृ. १५४. | |
| १३. | कानेटकर, मा.ज. | नागपूर प्रांताचा इतिहास पृ. ३५. | |
| १४. | बजाज जानकीदेवी | माझी जीवन यात्रा, पृ. ५८. | |
| १५. | देषपांडे, गो. आ. | ‘कॉंग्रेसचा इतिहास’ पृ. ३१३. | |

१६. माचवे, डॉ. प्रभाकर, नमक आंदोलन पृ. ४५.

१७. बजाज रामकृश्ण, ''जमनालाल बजाज की डायरी'' पृ. ६

१८. भारत सरकार, गृह मंत्रालय वार्शिक रिपोर्ट १९९६—९७.

१९. महाराष्ट्र साप्ताहिक बुधवार दि. २१ एप्रिल १९२० पृ. ७.

२०. महाराष्ट्र राज्य जिल्हा परिचय, नागपूर जिल्हा, पृ. १.

२१. वर्धा जिल्हाधिकारी रिपोर्ट फाईलमधून नं. १६१३, १६१४.

२२. तरुण भारतातील लेख, ता. ९—८—१९८७

२३. हरिजन'(मराठी आवृत्ती) १६ ऑगस्ट १९४२ पृ. २०७

२४. इंडियन एक्सप्रेस ग्रुप लोकप्रभा (४ डिसे. २००९)

२५. द. इंडिया टुडे ग्रुप इंडिया टुडे (१६ डिसे. २००९)

२६. वृत्तपत्र दैनिक लोकसत्ता नागपूर,<br>दैनिक लोकमत नागपूर,<br>दैनिक देशोन्ती नागपूर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचा उपक्रम

# रेणुका कॉलेज

पेट्रोल पंप समोर, बेसा, नागपूर

---

# बेसा गावातील स्वच्छता व स्वास्थ विषयक सर्वेक्षण

## विभाग अ) उत्तरदात्याची सर्वसामान्य माहिती

1) उत्तरदात्याचे नाव (कुटुंब प्रमुख) :–.................................................................................
:–वय..................जातः–..................धर्मः–......................
2) कुटुंब प्रमुखाचे शिक्षण :–दहावीच्या कमी/दहावी/बारावी/स्नातकच्या वर
3) घराचे स्वरूप :–मातीचे/कुळाचे/कच्चे घर/पक्के घर/फ्लॅट
4) कुटुंबातील एकूण सभासदांची संख्या :–मुले..........मुली .........इतर सदस्य...........एकूण.........
5) आपले मुळ गाव कोणते :–गाव............... तालुका ................जिल्हा .................
6) बेसा गावात स्थलांतरीत होण्याची कारणे :–रोजगार/शिक्षण/बदली/कामाची संधी
7) किती वर्षापासून तुम्ही या गावात राहता?:–.................................................................................
8) तुम्ही वर्तमानपत्र नियमित वाचता काय? :–होय / नाही /प्रतिसाद नाही.
9) तुम्ही दुरदर्शन वरील कार्यक्रम बघता काय? :–नियमित/अनियमित/कधी–कधी
10) गावातील आरोग्यविषयी विषयी मत :– शांततामय/तणावग्रस्त/धार्मिक/एकोप्याचे

## विभाग ब) गावातील स्वच्छता विषयक माहिती

11) गावात स्वच्छतेचे नियोजन आहे काय :–होय/नाही/माहित नाही
12) गावात कच–याचे नियोजन आहे काय :–ग्रामपंचायतचे कचरा वाहक/खाजगी
13) घरातील कचरा टाकण्याचे ठिकाण :– सार्वजनिक कचरा स्थळ/घराच्या बाजुला/कुठेही
14) आपण आपल्या घरातील स्वच्छते संबंधी नियोजन केले आहे काय ?
:–होय/नाही/माहित नाही
15) घरात शौचालय आहे काय? :–होय/नाही/माहित नाही
16) शौचालयाचा वापर नियमित करता काय? :–होय/नाही/माहित नाही
17) गावातील स्वच्छतेच्या समस्या वाहतुकीची समस्या, पाण्याची समस्या, ग्राम स्वच्छतेची समस्या, आरोग्य समस्या, कर्जबाजारीपणा इतर........................................
18) आपला गाव हागणदारी मूक्त आहे काय? :–होय/नाही/माहित नाही
19) गावात सुरू असणा–या आरोग्य विषयक योजना :–.....................................................................
20) गावात सुरू असणा–या इतर योजना :–निराधार योजना/ग्रामीण सडक योजना /घरकुल योजना/वृध्दापकाळ योजना/ रोजगार हमी योजना/ग्राम विकास योजना/कृषी संवर्धन योजना
21) सरकारकडून असणा–या अपेक्षा ..............................................................................

## विभाग क) गावातील स्वास्थ विषयक माहिती

22) आजारी पडल्यास तुम्ही कोणाचे औषध घेता :– घरघुती / मांत्रिक / डॉक्टर / जडीबुटी
23) घरापासून दवाखाण्याचे अंतर कीती आहे :–0–5किमी / 5–10किमी / 10–15किमी
24) गावात उपलब्ध आरोग्यविषयी सोयी :– ग्रामीण रूग्णालय / खाजगी डॉक्टर
25) प्रसुती करीता कोणाची मदत घेता :–दाई / प्रशिक्षीत दाई / वैद्य / डॉक्टर
26) बाळंतपणाचे ठिकाण :– घरीच / दवाखाण्यात
27) लहान मुलांचे लसिकरण करता काय (पोलीओ, ट्रिपल, बी.बी.सी,इ.) :– लसीकरण मिळत नाही / लसीकरणाची माहीती नाही / टिका व लसीकरणावर विश्वास नाही
28) मुलांना निरोगी राखण्यासाठीचे उपाय :– लस टोचून घेता / जडीबुटीचा उपयोग करता / देवाला नवस करणे
29) कुटुंब नियोजन केले आहे काय :–होय / नाही / प्रतिसाद नाही.
30) कुटुंबातील सदस्यांना असणारे आजार :–होय / नाही / प्रतिसाद नाही.
31) आंगणवाडीत उपलब्ध आरेग्यविषयक सोयींचा लाभ घेता काय :–होय / नाही / प्रतिसाद नाही.
32) गावातील आरोग्यविषयक उपलब्ध सोयी :–समाधानी / असमाधानी / खुपसमाधानी
33) आपल्या कुटुंबात कोणी अपंग / पोलीयोग्रत व्यक्ती आहे काय ? :–होय / नाही / प्रतिसाद नाही.
34) गावातील आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी उपाय सुचवा :–...........................................................

————————————————————————————————————

**दिनांक** :–..... / ..... / .............. **स्वाक्षरी** :–.................................. **(सहयोग दिल्याबद्दल धन्यवाद!)**